SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० **सांख्यिकी कक्ष ०२३१-२६०-९१४७.**
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/ 176** **दिनांक : 28/08/2026.**

# परिपत्रक

**प्रति,**
**मा. उपकुलसचिव,**
**सर्व प्रशासकीय विभाग,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE)**
महाविद्यालयांना AISHE Code व AISHE प्रमाणपत्र बंधनकारक केलेबाबत...

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून **अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) (www.aishe.gov.in)** या वेबपोर्टलवर सर्व संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालयाची प्रशासकीय, शैक्षणिक व शिक्षकेत्तर बाबींची माहिती भरुन घेण्यात येते. सदर वेबपोर्टलवर संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालयांनी भरलेल्या माहितीवरुन प्रत्येक राज्याचा GER, GPR व इतर आवश्यक माहिती तयार होत असते. बहुतांश AISHE Code असलेली महाविद्यालये वेबपोर्टलवर माहिती भरत नाही तसेच काही महाविद्यालयाकडे AISHE Code नसल्यामुळे सदर वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्यात येत नाही असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून AISHE अंतर्गत सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांना स्कॉलरशिप, नॅक व इतर शैक्षणिक कामासाठी AISHE प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे **दरवर्षी AISHE सर्वेक्षणाची माहिती भरुन अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याबाबतचे पत्र मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून विद्यापीठास प्राप्त झाले आहे.**

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरुन झालेल्या **आदेशान्वये** विद्यापीठातील सर्व **प्रशासकीय विभागानी महाविद्यालयाचे कोणतेही शैक्षणिक / प्रशासकीय कामकाज करताना किंवा मान्यता देताना संबंधित महाविद्यालयाने AISHE वेबपोर्टलवरील त्या वर्षाची माहिती भरुन AISHE प्रमाणपत्र प्राप्त केल्याची खातरजमा करुनच संबंधित महाविद्यालयाचे कामकाज करण्यात यावे.**

तसेच **AISHE Code अनिवार्य** करण्यात आले असल्याने **सोबत AISHE Code असलेली महाविद्यालयाची यादी जोडत आहोत. त्याप्रमाणे आपल्या विभागाच्या महाविद्यालयाच्या यादीत AISHE Code समाविष्ट करुन** घेण्यात यावा. प्रशासकीय विभागांतर्गत माहिती आदान-प्रदान करताना **अथवा महाविद्यालय / शासनास पत्रव्यवहार करताना महाविद्यालयाचा AISHE Code समाविष्ट करुन माहिती देण्यात यावी. सदर वेबपोर्टलवर संलग्नीत महाविद्यालयाकडून १००% माहिती भरण्याकरीता उपरोक्त उपाय-योजना करण्यात आल्या आहेत. संबधित प्रशासकीय विभागांनी उपरोक्त नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन सहकार्य करावे ही विनंती.**

**महाविद्यालये अथवा AISHE Code संदर्भात काही अडचणी असल्यास प्रशासकीय विभागांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०-९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
412 ई, बहिरट पाटील चौक,मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर, पुणे-411 001
stat.dhepune@nic.in संकेतस्थळ:- www.dhepune.gov.in ☎ 020-29707093

क्र.उशिसं/सांख्यिकी/AISHE/पोर्टलवरील नोंदणी/2026/E-1966259 दिनांक- /08/2026

अत्यंत तातडीचे

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषी/अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

विषय:- सर्व महाविद्यालयांना AISHE वेबपोर्टलवर नोंदणी अनिवार्य करणेबाबत..

संदर्भ:-1. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी शाश्वत विकास ध्येयातील निर्देशक साध्य करण्याच्या अनुषंगाने केलेल्या प्रगतीचा दिनांक-23/07/2026 रोजीची आढावा बैठक व दिनांक-28/07/2026 रोजीचे पत्र

2. उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सन 2023-24 चा प्रकाशित केलेला अहवाल

महोदय/महोदया,

संयुक्त राष्ट्रे (United Nations) यांचेकडून स्विकृत करण्यात आलेली 17 शाश्वत विकास ध्येये (SGDs) व त्याअंतर्गत 169 लक्ष्ये (Targets) सन-2030 पर्यंत साध्य करावयाची असून शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांनी घेतलेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने राज्याच्या प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने (SGDs) तील उच्च शिक्षण क्षेत्रातील एकूण नोंदणी GER (Gross Enrollment Rate) स्थूल पटसंख्या प्रमाण ५०% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.2 अन्वयेच्या उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांनी AISHE सन 2023-24 चा प्रकाशित केलेला अहवालाच्या अनुषंगाने राज्याला जर SDG ची उद्दिष्टे पूर्णपणे साध्य करायची असतील,तर डेटा व्यवस्थापन (Data Management) मजबूत करावे लागेल. त्यासाठी उच्च शिक्षण क्षेत्रातील डेटा वेळेवर अद्ययावत (Update) करणे गरजेचे आहे,जेणेकरून भविष्यातील शैक्षणिक धोरणे अधिक प्रभावीपणे आखता येतील.

सर्व विद्यापीठांना व त्यांच्या अंतर्गत असलेल्या संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांना AISHE code अनिवार्य करण्यात येत असून उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय,नवी दिल्ली यांच्याकडून AISHE अंतर्गत सर्व विद्यापीठांना/महाविद्यालयांना स्कॉलरशिप, नॅक व इतर शैक्षणिक कामासाठी AISHE च्या प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे दरवर्षी AISHE सर्वेक्षणाची माहिती भरून अपलोड करणे बंधनकारक आहे.

AISHE वेबपोर्टलवर उच्च शिक्षण विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व विद्यापीठांची,संलग्नित आणि स्वायत्त महाविद्यालयांची भरलेल्या माहिती वरून राज्याचा GER, GPR व इतर आवश्यक माहीती तयार होते.बहुतांश AISHE कोड असलेली महाविद्यालये AISHE वेबपोर्टलवर माहीती भरत नाही तसेच काही महाविद्यालयांकडे AISHE कोड नसल्यामुळे AISHE वेबपोर्टलवर माहीती नोंदविण्यात येत नाही असे निदर्शनास आले आहे.

विद्यापीठांच्या कोणत्याही शैक्षणिक कामासाठी महाविद्यालयांना AISHE Code व AISHE प्रमाणपत्र अनिवार्य करावे.नवीन महाविद्यालय स्थापन होताच 1 महीन्याच्या आत AISHE Code प्राप्त करून घेणे बंधनकारक करावे. तसेच सर्व विद्यापीठांनी नवीन महाविद्यालयांना संलग्नता पत्र देतेवेळी 1 महिन्याच्या आत AISHE code प्राप्त करून घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

ज्या महाविद्यालयांनी अद्याप AISHE Code प्राप्त करून घेतलेला नाही अशा संलग्नित/ स्वायत्त महाविद्यालयांसाठी विद्यापीठांनी तात्काळ पुढील 15 दिवसांत कॅंप घेऊन AISHE Code प्राप्त करून घ्यावा.

तरी उपरोक्त बाबतची आवश्यक माहीती खालील नमूद तक्त्यात भरण्यात यावी.

| विद्यापीठाचे नाव | संलग्नित महाविद्यालयांची संख्या (फक्त उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत) | AISHE Code असलेली महाविद्यालयांची संख्या | AISHE Code अप्राप्त असलेल्या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 14-08-2026 13:28:27

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत-माहीतीस्तव सविनय सादर:-

1. मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभा,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई

2. मा. कुलगुरू,सर्व विद्यापीठे
3. सहसंचालक,सव विभागीय सहसंचालक कार्यालय यांनी देखील वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी

प्रत-पुढील कार्यवाहीसाठी:-

1. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
2. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
3. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
4. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर
6. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
7. कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक,जि.नागपूर
8. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई
9. मुंबई विद्यापीठ,मुंबई
10. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
11. गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
12. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर